गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 886 दि. 27/10/2015
जावक क्र. ........ दि. ........

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग नागपूर.**
**जूने मॉरीस कॉलेज ईमारत परीसर सिताबर्डी,नागपूर.**
**(दुरध्वनी क्र२५६१७१३ फॅक्स क्र०७१२-२५५४२१० )**
Website.www.dirhe.org.in/jdnagpur Email-rjdng.dhepune@gov.in

ई-मेलव्दारे

क्रमांक: उशिनाग/शिशुस/बि.एड./५६६७ /१५
दिनांक :- १६/१०/२०१५

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 7368 दि. 29/10/1
जावक क्र. ....... दि. .......

**प्रति,**

**प्राचार्य, (सर्व)**
अशासकिय विनाअनुदानीत व कायम विना अनुदानीत
शिक्षणशास्त्र महाविद्यालये, नागपूर विभाग,नागपूर

**विषय** :- राज्यातील विना अनुदानीत व कायम विना अनुदानीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याबाबत.

**संदर्भ** :- १. शासन पत्र क्र. शुल्क ५२१५/प्र.क्र.२८०/मशि २ दिनांक १९/०९/२०१५
२. मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,म.रा.पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१४-१५/शिशुस/ प्र.क्र. १८३/भाग-१/बीएड, दिनांक १२/१०/२०१५

उपरोक्त विषयाचे संदर्भिय शासन पत्र व शिक्षण संचालनालयाचे पत्राचे कृपया अवलोकन करावे, सुलभ संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

सन २०१५-१६ पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेचे (NCTE) सुधारीत निकष लागू झाले असल्यामुळे विनाअनुदानीत/कायमविनाअनुदानीत अध्यापक महाविद्यालयांना त्यांच्या सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी आकारलेल्या मान्यता प्राप्त शुल्कामध्ये ५ टक्के वाढ करुन निश्चित होणा-या रक्कमेपैकी निम्मे शुल्क शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी अंतरीम शिक्षण शुल्क (Adhoc Fee) म्हणून आकारण्यास शिक्षण शुल्क समितीने मान्यता दिलेली आहे. शिक्षण शुल्क समितीच्या सदर निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता राज्यातील विनाअनुदानीत/कायमविना अनुदानीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना त्यांच्या सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी आकारलेल्या मान्यता प्राप्त शुल्कामध्ये ५ टक्के वाढ करुन निश्चित होणा-या रक्कमेपैकी निम्मे शुल्क शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमासाठी अंतरीम शिक्षण शुल्क (Adhoc Fee) म्हणून आकारण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार राज्यातील विनाअनुदानीत/कायमविना अनुदानीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करुन त्यास शिक्षण शुल्क समितीची मान्यता घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही संदर्भिय पत्रान्वये करण्यात यावी.

**सहपत्र :- वरीलप्रमाणे.**

A. M. Rahatgaonkar
**(डॉ.अंजली रहाटगांवकर)**
सहसंचालक,उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर

**प्रत,१.**मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,म.रा.पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.कुलसचिव, अकृषि विद्यापीठे नागपूर विभाग,नागपूर यांना संदर्भिय पत्रासह आवश्यक कार्यवाहीकरीता
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग नागपूर.
जूने मॉरीस कॉलेज ईमारत परीसर सिताबर्डी,नागपूर.
(दुरध्वनी क्र२५६१७१३ फॅक्स क्र०७१२-२५५४२१० )
Website.www.dirhe.org.in/jdnagpur Email-rjdng.dhepune@gov.in

ई-मेलव्दारे

क्रमांकः उशिनाग/शिशुस/बि.एड./५६६७ /१५
दिनांक :- १६/१०/२०१५

प्रति,
**प्राचार्य, (सर्व)**
अशासकिय विनाअनुदानीत व कायम विना अनुदानीत
शिक्षणशास्त्र महाविद्यालये, नागपूर विभाग,नागपूर

**विषय** :- राज्यातील विना अनुदानीत व कायम विना अनुदानीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याबाबत.

**संदर्भ** :- १. शासन पत्र क्र. शुल्क ५२१५/प्र.क्र.२८०/मशि २ दिनांक १९/०९/२०१५
२. मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,म.रा.पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१४-१५/शिशुस/प्र.क्र. १८३/भाग-१/बीएड, दिनांक १२/१०/२०१५

उपरोक्त विषयाचे संदर्भिय शासन पत्र व शिक्षण संचालनालयाचे पत्राचे कृपया अवलोकन करावे, सुलभ संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

सन २०१५-१६ पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेचे (NCTE) सुधारीत निकष लागू झाले असल्यामुळे विनाअनुदानीत/कायमविनाअनुदानीत अध्यापक महाविद्यालयांना त्यांच्या सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी आकारलेल्या मान्यता प्राप्त शुल्कामध्ये ५ टक्के वाढ करुन निश्चित होणाऱ्या रक्कमेपैकी निम्मे शुल्क शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी अंतरीम शिक्षण शुल्क (Adhoc Fee) म्हणून आकारण्यास शिक्षण शुल्क समितीने मान्यता दिलेली आहे. शिक्षण शुल्क समितीच्या सदर निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता राज्यातील विनाअनुदानीत/कायमविना अनुदानीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना त्यांच्या सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी आकारलेल्या मान्यता प्राप्त शुल्कामध्ये ५ टक्के वाढ करुन निश्चित होणा-या रक्कमेपैकी निम्मे शुल्क शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमासाठी अंतरीम शिक्षण शुल्क (Adhoc Fee) म्हणून आकारण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार राज्यातील विनाअनुदानीत/कायमविना अनुदानीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करुन त्यास शिक्षण शुल्क समितीची मान्यता घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही संदर्भिय पत्रान्वये करण्यात यावी.

**सहपत्र :- वरीलप्रमाणे.**

A.M. Rahatgaonkar
**(डॉ.अंजली रहाटगांवकर)**
सहसंचालक,उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर

**प्रत,१** मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,म.रा.पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.कुलसचिव, अकृषि विद्यापीठे नागपूर विभाग,नागपूर यांना संदर्भिय पत्रासह आवश्यक कार्यवाहीकरीता

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
Web:www.dhepune.gov.in
E-mail : bed.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२१,२६१२२११९,२६०५१५१२,    फॅक्स नं.०२०/२६१२११५३

क्रमांक उशिसं/२०१४-१५/शिशुस/प्र.क्र.१८३/भाग-१/बीएड    दिनांक १२.१०.२०१५

जावक क्र. 8353
कार्यालय, उच्च शिक्षण सहसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर - ४४० ००१
दिनांक 98.90.95

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

**विषय : राज्यातील विना अनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याबाबत.**

**संदर्भ :** शासन पत्र क्रमांक शुल्क-५२१५/प्र.क्र.२८०/मशि-२, दिनांक १५.०९.२०१५

उपरोक्त संदर्भीय शासन पत्र कृपया पहावे. सुलभ संदर्भासाठी शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार सन २०१५-१६ पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेचे (NCTE) सुधारीत निकष लागू झाले असल्यामुळे विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयांना त्यांच्या सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी आकारलेल्या मान्यता प्राप्त शुल्कामध्ये ५ टक्के वाढ करुन निश्चित होणाऱ्या रकमेपैकी निम्मे शुल्क शैक्षणिक वर्षे २०१५-१६ साठी अंतरिम शिक्षण शुल्क (Adhoc Fee) म्हणून आकारण्यास शिक्षण शुल्क समितीने मान्यता दिलेली आहे. शिक्षण शुल्क समितीच्या सदर निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता राज्यातील विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना त्यांच्या सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी आकारलेल्या मान्यता प्राप्त शुल्कामध्ये ५ टक्के वाढ करुन निश्चित होणाऱ्या रकमेपैकी निम्मे शुल्क शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमासाठी अंतरिम शिक्षण शुल्क (Adhoc Fee) म्हणून आकारण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार राज्यातील विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता शिक्षणशास्त्र (प्रथमवर्ष) अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करुन त्यास शिक्षण शुल्क समितीची मान्यता घेण्याबाबत आवश्यक त्या सूचना आपल्या विभागातील विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना देण्यांत याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास पाठविण्यांत यावा.

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
यांचेकरीता

14.10.2015

E:\Hemant\2015-16\Letters 15-16.doc

महाराष्ट्र शासन

क्रमांक- शुल्क ५२१५/प्र.क्र.२८०/मशि-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- १५ सप्टेंबर, २०१५.

18 SEP 2015 18400 Bed

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय:- राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्रमांक :उशिस / २०१४-१५/शिशुस/प्र.क्र.१८३/भाग-१/ बी.एड., दिनांक ३.९.२०१५.

राज्यातील विना अनुदानित / कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालातील शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याकरिता दि.०५.०७.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र शिक्षण शुल्क समिती गठीत करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेचे (NCTE) सुधारीत निकष लागू झाले असल्यामुळे विना अनुदानित / कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयांना त्यांच्या सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी आकारलेल्या मान्यता प्राप्त शुल्कांमध्ये ५% वाढ करुन निश्चित होणाऱ्या रकमेपैकी निम्मे शुल्क शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी अंतरिम शिक्षण शुल्क (adhoc fees) म्हणून आकारण्यास सदर शिक्षण शुल्क समितीने मान्यता दिलेली आहे.

२. शिक्षण शुल्क समितीच्या सदर निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता राज्यातील विना अनुदानित / कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना, त्यांच्या सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी आकारलेल्या मान्यताप्राप्त शुल्कामध्ये ५% वाढ करुन निश्चित होणाऱ्या रकमेपैकी निम्मे शुल्क शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमासाठी अंतरिम शिक्षण शुल्क (adhoc fees) म्हणून आकारण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. त्यानुसार राज्यातील विना अनुदानित / कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करुन त्यास शिक्षण शुल्क समितीची मान्यता घेण्याबाबत आवश्यक त्या सूचना संचालक स्तरावरुन निर्गमित करण्यात याव्यात. तसेच सर्व अकृषी विद्यापीठे व संबंधित सर्व अधिकाऱ्यांना याबाबत अवगत करावे.

४. शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ करिता शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष) अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याबाबत तात्काळ शिक्षण शुल्क समितीकडे प्रस्ताव सादर करावा.

B.ed
For n. a. p.
18/9

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी नवीन शिक्षण शुल्क समिती गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः शुल्क-२०१२/प्र.क्र. १८३/१२ मशि-२**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: ०५ जुलै, २०१३

**प्रस्तावना :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाने टीएमए पै फौडेंशन विरुध्द कर्नाटक राज्य या न्यायालयीन प्रकरणी ११ न्यायाधिशांच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार शासन निर्णय क्र.युएसजी-२००३/(८५/०३)/विशि-४, दि.२४/९/२००३ अन्वये गठीत करण्यात आलेल्या शिक्षण शुल्क समितीकडून राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यात येत आहे. दरम्यान राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांची अधिसुचना क्र.एफ नं.५१-३/२००९/पीटी/एनसीटीई(एन ॲन्ड एस), दिनांक २५ ऑगस्ट, २०१० अन्वये National Council For Teacher Education ( Guidelines for regulation of tuition fees and other fees chargeable by unaided teacher education Institutions) Amendment Regulation,२०१० निर्गमित केली आहे. सदर विनियमातील तरतुदीनुसार विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीची रचना विहीत केली आहे. या पार्श्वभूमीवर श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था तसेच प्राचार्य, श्री साईबाबा अध्यापक महाविद्यालय, गडचिरोली यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका क्र.२९११/२०१० अन्वये सध्या अस्तित्त्वात असलेल्या शिक्षण शुल्क समितीकडून विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांतील अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्याच्या अधिकारितेच्या वैधतेबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. शिक्षण शुल्क समितीनेही राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद विनियमानुसार विना अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्याचे अधिकार शिक्षण शुल्क समितीस नसल्याची भुमिका घेतली होती. सदर न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांनी National Council For Teacher Education ( Guidelines for regulation of tuition fees and other fees chargeable by unaided teacher education Institutions) Amendment Regulation,२०१० मधील तरतुदीनुसार शिक्षण शुल्क समिती गठीत करण्याचा निर्णय दिला आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त विनियमानुसार राज्यातील विना अनुदानित व

कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी स्वतंत्र शिक्षण शुल्क समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

National Council For Teacher Education ( Guidelines for regulation of tuition fees and other fees chargeable by unaided teacher education Institutions) Amendment Regulation, २०१० मधील नियम ५ मधील तरतुदीनुसार राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी पुढीलप्रमाणे शिक्षण शुल्क समिती गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव, वित्त विभाग किंवा त्यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग किंवा त्यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | Institutional finance, Cost Accountancy and Economics यामधील २ तज्ञ व्यक्ती नामनिर्देशनाने<br>१) प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य, महाविद्यालय, मुंबई,<br>२) एक सनदी लेखापाल | सदस्य |
| ५. | खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचा १ प्रतिनिधी नामनिर्देशनाने | सदस्य |
| ६. | सह संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| ७. | संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य , पुणे | सदस्य सचिव |

**<u>नामनिर्देशित समिती सदस्यांचा कार्यकाल</u>**: नवीन शिक्षण शुल्क समितीतील नामनिर्देशित सदस्यांचा कार्यकाल ३ वर्षाचा राहील.

**<u>समितीची कार्यकक्षा</u>** : शिक्षण शुल्क समिती राज्यातील अकृषी विद्यापीठांशी सलंग्नीत विना अनुदानित/कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी. एड, एम. एड या अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चित करील.

**<u>समितीच्या जबाबदाऱ्या</u>** :

१. राज्यातील अकृषि विद्यापीठ क्षेत्रातील प्रत्येक विना अनुदानीत/कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क लागू करण्यासंबंधी सूत्र तयार करणे व त्यास योग्य प्रमाणात प्रसिध्दी देणे,
२. शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी कार्यपध्दती विहित करणे,
३. दरवर्षी शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी वेळापत्रक जाहीर करणे.
४. विहीत मुदतीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर न केल्यास विलंब कालावधीसाठी दंडात्मक शुल्क आकारणीचे दर विहीत करणे.

५. संबंधित महाविद्यालयांचे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यासाठी सदर संस्थेची स्थापना, कार्यक्षेत्र, शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम, विद्यार्थी संख्या व त्यासंदर्भात एन.सी.टी.ई./शासन इत्यादी यांनी विहित केलेले निकष याची माहिती प्राप्त करुन घेणे.

६. शैक्षणिक अभ्यासक्रम राबविण्याच्या पध्दती, कार्यभार व त्यावरील नियुक्त्या, परीक्षा पध्दती व त्यावरील खर्चाची माहिती घेणे व पुढील पाच वर्षातील संस्थेच्या विकासात्मक कार्याची माहिती घेणे, यासाठी योग्य ती कार्यपध्दती विहीत करणे,

७. महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रस्तावात दिलेली माहिती ही वस्तुस्थितीनुरुप असल्याबाबतची खातरजमा करुन/प्रस्तावाची तपासणी करून विहीत करण्यात आलेल्या सूत्रानुसार संबधित संस्था/महाविद्यालयातील शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शुल्क एक महिन्याच्या आत निश्चित करणे.

८. शुल्क प्रमाणित करतांना शिक्षणशास्त्र महाविद्यालयाकडून उपलब्ध झालेल्या माहितीची पडताळणी करून शुल्क निश्चिती करणे. मात्र, यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास वा वाद निर्माण झाल्यास त्याबाबत तपासणी पथकामार्फत प्रत्यक्ष तपासणी करुन वस्तुस्थितीनुसार तक्रार निवारण करण्याचे अधिकार शासनाकडे असतील.

९. महाविद्यालयांनी प्रस्तावित केलेल्या व समितीने निश्चित केलेल्या शुल्काची अंमलबजावणी संस्थांनी करुन त्याचा अहवाल शासनास, विद्यापीठास, संबंधित आयोगास एन.सी.टी.ई. इत्यादी यांना कळविल्याची खात्री करणे व एक प्रत समितीकडे ठेवणे.

१०. समितीने निश्चित केलेले शुल्क हे पुढील ३ वर्षासाठीच लागू राहिल. त्यानंतर पुढील कालावधीसाठी हे शुल्क पुन्हा निश्चित करुन घ्यावे लागेल.

**<u>शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून शिक्षण शुल्क समितीने आकारावयाचे शुल्क:-</u>**

राज्यातील मान्यताप्राप्त शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी शिक्षण समितीकडून शिक्षण शुल्क निश्चित करताना समितीकडे नोंदणी करणे आवश्यक असून त्यापोटी भरावयाच्या नोंदणी शुल्काचे दर पुढीलप्रमाणे राहतील :-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | संस्था/विद्यापीठाचे ठिकाण | नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|
| १. | शिक्षणशास्त्र पदवी ( बी. एड ) | राज्यातील महाविद्यालये | रु.३०,०००/- |
| २. | शिक्षणशास्त्र पदव्युत्तर ( एम. एड) | राज्यातील महाविद्यालये | रु.४५,०००/- |
| ३. | शिक्षणशास्त्र पदवी/पदव्युत्तर ( बी. एड./ एम. एड) | इतर राज्यातील महाविद्यालये | रु.२ लक्ष |
| ४. | शिक्षणशास्त्र पदवी/पदव्युत्तर ( बी. एड./ एम. एड) | विदेशी संस्था/विद्यापीठे | रु.५ लक्ष |

**समितीचे कार्यालय**

समितीचे कार्यालय शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालय, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई येथे राहील. यासाठी शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या परिसरातील १ खोली कार्यालयासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच समितीच्या बैठकीसाठी शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयाकडून सेमिनार हॉल उपलब्ध करुन देण्यात येईल.

समितीच्या दैनंदिन कामकाजासाठी खालीलप्रमाणे पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | स्वरुप | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | सह संचालक, उच्च शिक्षण | १ | कायम स्वरुपी | १५६००- ३९१०० ग्रेड पे. ७६०० |
| २ | प्रशासकीय अधिकारी (वर्ग-१) | १ | कायम स्वरुपी | १५६००- ३९१०० ग्रेड पे. ५४०० |
| ३ | वरिष्ठ लिपिक | १ | कायम स्वरुपी | ५२००-२०२०० ग्रेड पे. २४०० |
| ४ | कनिष्ठ लिपिक (रोखपाल) | १ | कायम स्वरुपी | ५२०० - २०२०० ग्रेड पे. १९०० |
| ५ | लिपिक | २ | कंत्राटी | रु ७०००/- दरमहा |
| ६ | लघुलेखक | १ | कंत्राटी | रु ७०००/- दरमहा |
| ७ | शिपाई | २ | कंत्राटी | रु ४०००/- दरमहा |
| ८ | सफाई कामगार | १ | कंत्राटी | रु ४०००/- दरमहा |
| ९ | कामाचा ओघ विचारात घेवून साधारणत: ६ महिन्यांकरिता कंत्राटी पध्दतीने ४ लिपिक (यादी तपासणी / लेखा परीक्षणकरीता) | ४ | कंत्राटी | रु ७०००/- दरमहा |

सन २०१३-१४ हे नवीन शैक्षणिक वर्ष काही काळातच सुरु होत आहे. राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीचे कार्यालय सुरु करण्यापासून ते पुर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यास काहीसा कालावधी लागेल. शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी शिल्लक असलेल्या अत्यल्प कालावधीत शिक्षण शुल्क समिती काम सुरु करु शकत नसल्याने समिती कार्यान्वित होईपर्यंत शासन निर्णय क्र.युएसजी-२००३/(८५/०३)/विशि-४, दि.२४/९/२००३ अन्वये गठीत करण्यात आलेली शिक्षण शुल्क समिती शुल्क निश्चितीचे काम पाहील.

समिती कार्यान्वित करण्यासाठी पहिल्या वर्षी कार्यालय सुरु करण्यासाठी पुर्व तयारी/खर्च (उदा.दुरुस्ती, नुतनीकरण, दुरध्वनी व विद्युत जोडणी, संगणक व इंटरनेट, कार्यालयीन स्टेशनरी व यंत्रसामुग्री इ.) रु.३० लक्ष, कार्यालय सुरु झाल्यानंतर येणारा खर्च (कार्यालयीन खर्च) रु.५ लक्ष (आवर्ती) व नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनासाठी रु.२५ लक्ष (आवर्ती) असा एकूण अंदाजे रु.६० लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

पहिले वर्ष वगळता पुढील हंगामी आर्थिक वर्षात येणाऱ्या संभाव्य खर्चाच्या रकमेतून समितीकडे अगोदरच्या वर्षात जमा झालेला निधी वजा करुन उर्वरित रक्कम शासनाकडून उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आर्थिक तरतुद उपलब्ध झाल्याशिवाय कायमस्वरुपी अथवा कंत्राटी पध्दतीवरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार नाही याची संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दक्षता घ्यावी.

याबाबतचा सन २०१३-१४ व त्यापुढील खर्च मागणी क्रमांक-डब्ल्यू २२०२ - सर्वसाधरण शिक्षण, ८०सर्वसाधारण, ००१ संचालन व प्रशासन (०१)(०२) समिती, पंचवार्षिक योजनातंर्गत योजना (२२०२H१०९) या लेखाशिर्षाखालील उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौ. संदर्भ क्र.४२७/व्यय-५, दिनांक २२.५.२०१३ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७०५१५०१३७९६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRANATH BABU MAYEKAR

Digitally signed by RAVINDRANATH BABU MAYEKAR
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=RAVINDRANATH BABU MAYEKAR
Date: 2013.07.08 14:48:33 +05'30'

**र. बा. मयेकर**
अवर सचिव, महाराष्ट शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अप्पर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई .

६. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, विधानमंडळ, सचिवालय, मुंबई.
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण.
१०.महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
११.महालेखापाल ( लेखापरीक्षा ), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३.मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४.मा. राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५.प्रधान सचिव ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१६.सर्व अवर सचिव / कार्यासन अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.निवड नस्ती (मशि-२).